




दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २३६
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, सोमवार, दि.०७ एप्रिल २०२५







## उद्धव ठाकरेंची शिवसेना पुढच्या निवडणुकीपर्यंत राहणार नाही : रावसाहेब दानवेंचा दावा



**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.०६, मुंबई :** गेल्या काही दिवसांपासून राज्याच्या राजकारणात आरोप-प्रत्यारोप सुरु असल्याचं पाहायला मिळत आहे. राज्यातील विविध मुद्यांवरून विरोधक महायुती सरकारवर टीका करत आहेत, तर त्या टीकेला सत्ताधारी पक्षाचे नेते जोरदार प्रत्युत्तर देत आहेत. यातच आज भारतीय जनता पक्षाचा वर्धापन दिन असल्याने राज्यातील विविध ठिकाणी कार्यक्रम पार पडले आहेत. जालना जिल्ह्यात देखील या पार्श्वभूमीवर मजबूत संघटन ऑनलाईन कार्यकर्ता संमेलन पार पडलं.

या संमेलनाच्या माध्यमातून भाजपाचे नेते तथा माजी खासदार रावसाहेब दानवे यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केलं. मात्र, याचवेळी रावसाहेब दानवे यांनी काँग्रेस, राष्ट्रवादी (शरद पवार) आणि ठाकरे गटावर जोरदार टीका केली. यावेळी रावसाहेब दानवे यांनी एक मोठा दावा केला आहे. 'उद्धव ठाकरे यांची शिवसेना पुढच्या निवडणुकीपर्यंत राहणार नाही', असं विधान रावसाहेब दानवे यांनी केलं आहे.

**रावसाहेब दानवे नेमकं काय म्हणाले?**

एक काळ असा होता की जिल्ह्यात शिवसेनेचे ३ आमदार आणि भारतीय जनता पार्टीकडून मी एकटाच आमदार होतो. मात्र, आज काळ असा आहे की भारतीय जनता पक्षाचे ३ आमदार आणि शिवसेनेचे २ आमदार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचं कोणी आहे का? म्हणजे काँग्रेस आणि राष्ट्रवादीची मोठी ताकद होती. पण त्यांच्या वागण्यामुळे आणि व्यवहारामुळे लोक त्यांच्या विचारापासून दूर गेले. त्यामुळे काँग्रेस जवळपास संपुष्टात आली, तर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) संपली आणि उद्धव बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना पुढच्या निवडणुकीपर्यंत राहत नाही, असं रावसाहेब दानवे यांनी म्हटलं आहे.

**नारायण राणे यांचीही उद्धव ठाकरेंवर टीका**

भाजपा नेते नारायण राणे यांनीही आज माध्यमांशी संवाद साधत उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टीका केली. नारायण राणे म्हणाले की, तुम्ही चांगल्या दिवशी नको त्या माणसाचं नाव घेता. विकास, समृद्धी, लोकहित हे उद्धव ठाकरेंचं काम नाही. शिव्या घालणं आणि चांगल्या कामात व्यत्यय आणणं हे उद्धव ठाकरे यांच काम आहे, अशा शब्दांत नारायण राणे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली.

राणे पुढे म्हणाले की, त्यामुळे त्यांचा (उद्धव ठाकरे) पक्ष आवळत चालला आहे. पुढच्या निवडणुकीपर्यंत हा पक्ष राहत नाही. मी ३९ वर्ष त्यांच्याबरोबर काम केलं आहे. माननीय बाळासाहेब ठाकरे होते तेव्हा पक्ष होता. पण बाळासाहेब ठाकरे गेले आणि शिवसेना संपली, अशी टीका नारायण राणे यांनी केली आहे.

## थोडक्यात

### बारडमध्ये रानडुकराच्या हल्ल्यात शेतमजूर गंभीर जखमी



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**
**दि.६, मुदखेड (नांदेड) :** तालुक्यातील बारड येथे शेतात काम करत असलेल्या संदीप आठवले वय ३५ या शेत मजुरावर रानडुकराने अचानक हल्ला केला. यात आठवले गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर बारड येथील ग्रामीण रूग्णालयात उपचार सुरू आहेत. या परिसरात वानर, माकडे, रानडुक्कर, बिबटे आणि रोहींचा हौदोस माजाला असल्याने वन विभाग कोमात आणि जंगली प्राणी जोमात असल्याची चर्चा आहे.

संदीप गोविंदराव आठवले शेतातील ज्वारी पिकाला दि. ५ शनिवार रोजी पाणी देत असताना रान डुक्कराने मागून हल्ला केला. यात आठवले यांच्या पायाचा लचका तोडून हल्ला केला. या घटनेनंतर वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी भेट देऊन पंचनामा केला. तसेच जखमींना शासनाच्या नियमानुसार मदत देण्यात येईल असे कर्मचाऱ्याने सांगितले आहे.


बारड परिसरात मागच्या अनेक वर्षांपासून वानरे, माकडे, रान डुक्करे, रोही यांचा खुलेआम वावर असून माकडाच्या हल्ल्यात मध्यंतरी गावात एक बालकही मृत्युमुखी पडला होता. सध्या वानराचा आणि माकडांचा धुमाकूळ असल्यामुळे गावात माकड'राज' निर्माण झाले आहे. पूर्वी ग्रामपंचायत द्वारे वानरांचा बंदोबस्त करण्यासाठी गावात बंदूकदारी कर्मचारी असायचा, मागच्या दहा वर्षात बंदूकधारी कर्मचारी बेदखल झाल्याने गावात आता माकड'राज' निर्माण झाले आहे. त्यामुळे सध्या वनविभागाचे वन्य प्राण्यांच्या बंदोबस्ताकडे अक्षम्य दुर्लक्ष असल्यामुळे परिसरात वन्य प्राण्यांचा धुमाकूळ माजला आहे.

### ओला-उबेर मुळे महाबळेश्वर येथील टॅक्सी व्यवसाय अडचणीत



**अक्षराज : रियाज मुजावर**
**दि.०६, महाबळेश्वर :** महाबळेश्वर हे पर्यटन स्थळ असल्यामुळे स्थानिक टॅक्सी व टूरिस्ट टॅक्सी यांना पर्यटनावर अवलंबून राहणे हाच पर्याय आहे. त्यामुळे येथे येणाऱ्या पर्यटकांना स्थानिक स्थळ दर्शन तसेच पुणे मुंबई येथे विमानतळ रेल्वे स्टेशन अथवा त्यांच्या इच्छित स्थळा पर्यंत सोडण्यासाठी मिळणारे भाडे हेच त्यांच्या व्यवसाय व उदारनिर्वाहाचे साधन आहे. परंतु बाहेर शहरातील ओला उबर सारख्या कार्पोरेट व ऑनलाईन कंपन्या आता महाबळेश्वर या पर्यटन स्थळी आपल्या व्यवसायाचा शिरकाव वाढवू लागल्याने येथील सुमारे ८०० पेक्षा जास्त टॅक्सी व टुरिस्ट टॅक्सी व्यावसायिकांवर उपासमारीची वेळ येऊ लागली आहे. आधीच पर्यटक स्वतःची वाहने घेऊन येत असल्याने त्यांच्या व्यवसायावर मोठा परिणाम झाला आहे. त्यामध्ये ओला उबर सारख्या ऑनलाईन पोर्टल कंपनी येथे व्यवसाय करण्यासाठी शिरकाव केल्याने व्यवसायावर मोठा परिणाम झाल्याचे दिसून येत आहे. त्याचबरोबर या ऑनलाइन कंपन्या हे स्थानिक व्यावसायिकांना शासनाने ठरवून दिलेल्या दरापेक्षा कमी दराने भाडे स्वीकारत आहेत परंतु स्थानिकांना शासनाने ठरवलेल्या दरापेक्षा कमी दराने भाडे स्वीकारता येत नसल्याने गोंधळाचे वातावरण व अनेक वेळा विनाकारण वाद तंट्यामुळे पर्यटकांवर व येथील पर्यटनावर देखील गैरसमजुतीने मोठा परिणाम होताना दिसत आहे. शासनाने येथील पर्यटन व्यवसाय वर अवलंबून असणाऱ्या व्यावसायिकांना येथे व्यवसाय करण्यासाठी दर ठरवून दिले आहेत. याबाबत टॅक्सी चालक व टुरिस्ट चालकांनी अनेक वेळा स्थानिक प्रशासनासह जिल्हा प्रशासनाकडे याबाबत ठोस कार्यवाहीची मागणी केली आहे. परंतु अद्याप कोणताही ठोस निर्णय होत नसल्यामुळे ऑनलाईन कंपन्यांची टांगती तलवार नेहमीच येथील व्यवसायिकांवर घोंगावताना दिसत आहे. यापूर्वी देखील महाबळेश्वर पालिकेने २०२४ साली नगरपालिकेत ठराव करून स्थानिक टॅक्सी संघटना व टुरिस्ट संघटनांना व्यवसाय करण्यासाठी ओला उबर सारख्या ऑनलाईन बुकींग करणाऱ्या कंपन्यांवर बंदी घालण्यासाठी प्रशासनाकडे पालिकेने ठराव देखील केला होता. परंतु तरीही अद्याप प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्यामुळे ओला उबर सारख्या ऑनलाईन कंपन्यांचा या पर्यटन स्थळांवरील शिरकावामुळे स्थानिक व्यावसायिकांना मोठा आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत आहे.

## पुणे ते शिर्डी प्रवासाचे अंतर होणार कमी ५० ते ६० किलोमीटरचे अंतर घटणार



**अहिल्यानगर जिल्ह्यातील तीर्थक्षेत्र पर्यटनाला चालना!**

या मार्गामुळे फक्त प्रवासच कमी वेळात आणि अंतराने पुर्ण होणार नाही, तर शिर्डीच्या आसपासच्या तीर्थक्षेत्र पर्यटन विकास आराखडाही मजबूत होणार आहे. जिल्ह्यात येणाऱ्या भाविकांसाठी पायभूत सुविधा आणि कमी अंतराचे रस्ते विकसित करणे हे महत्त्वाचे असून,हा प्रस्तावित मार्ग भाविक, नागरिक आणि शेतकऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण आणि अतिशय उपयुक्त ठरेल.

**-- राधाकृष्ण विखे पाटील, जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री**

**अक्षराज : वसंत रांधवण**
**दि.६, शिर्डी (अहिल्यानगर) :** पुणे-नाशिक महामार्गाला जोडणाऱ्या राहाता ते संगमनेर तालुक्यातील पानोडी या ३६ किलोमीटरच्या काँक्रीट रस्त्याचे सुमारे १५४ कोटी रुपयांचे काम सुरू झाले आहे. पुणे येथून साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीत येणाऱ्या साईभक्तांचे या रस्त्यामुळे ५० ते ६० किलोमीटरचे अंतर घटणार आहे. महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा महामंडळ, मुंबई या कार्यालयामार्फत हे काम होत आहे. राहाता, दहेगाव, केलवड, पिंपरी-लोकाई, लोहारे, निमगाव जाळी, आश्वी, शिपलापूर व पानोडी या गावांतून हा रस्ता जाणार आहे. संगमनेर तालुक्यातून जाणाऱ्या नाशिक-पुणे महामार्गाला हा नवीन मार्ग जोडला जाणार आहे. केलवड ते दहेगाव दरम्यानचा डांबरी रस्ता पूर्णपणे फोडला आहे. हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडून महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा महामंडळ, मुंबई कार्यालयाकडे हस्तांतरित करण्यात आला असल्याचे बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

**कसा असेल रस्ता?**

रस्त्याची रुंदी ७ मीटर रुंद असून, दोन्ही बाजूने दीड - दीड मीटर मुरूमीकरण म्हणजेच एकूण १० मीटरचा हा दोन पदरी मार्ग आहे. केलवड, आश्वी व शिपलापूर या मोठ्या गावांमध्ये १० मीटरचे काँक्रिटीकरण, दोन्ही बाजूने एक-एक मीटर पेव्हिंग ब्लॉक व दोन्ही बाजूने १.२०० मीटर साईड गटार म्हणजेच या तीन गावांमध्ये एकूण १४.५ मीटरचा हा रस्ता असेल. ऑक्टोबर महिन्यात सुरू झालेले हे काम ३० महिन्यांत पूर्ण केले जाणार आहे.

## सप्तशृंगी देवीच्या चरणी किन्नर आखाड्याच्या वतीने चांदीचा मुकुट अर्पण



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**
**दि.६, विंचूर (नाशिक) :** सप्तशृंगीगड हे साडेतीन शक्तीपीठांपैकी महत्त्वाचे मानले जाणारे शक्तिपीठ अर्थातच सप्तशृंगी देवी या आदिशक्तीला किन्नर आखाड्याचे महामंडलेश्वर पायल नंदगिरी, भगवती नंदगिरी, तसेच थोर समाजसेविका गौरी सावंत, यांच्यामार्फत चांदीचा मुकुट अर्पण करण्यात आला. चैत्र-पौर्णिमेच्या यात्रा उत्सवाच्या सुरुवातीला काही दिवस आधीच हा मुकुट अर्पण करण्याचा मानस संबंधित महामंडलेश्वर पायल नंदगिरी यांनी केला होता. या अनुषंगाने दिनांक ४ एप्रिल रोजी या मुकुटाची सप्तशृंगी गड येथे राजेश्वरी भक्तनिवास येथे विंचूर येथील संजय जोशी गुरुजी यांच्या हस्ते विधिवत पूजन करण्यात आले. तसेच सप्तशृंगी गड परिसरातून वाजत गाजत भव्य मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर राजेश्वरी भक्तनिवास येथे होम यज्ञ व विविध प्रकारच्या विधिवत पूजा करत हा मुकुट दिनांक पाच एप्रिल रोजी सकाळी सप्तशृंगी देवी च्या चरणी अर्पण करण्यात येणार आहे. याबाबत अधिक माहिती घेतली असता थोर समाजसेविका गौरी सावंत यांच्या म्हणण्यानुसार ही महाराष्ट्रातील पहिलीच घटना होय जी की सिन्नर समुदायाच्या वतीने आदिशक्तीला किंवा कुठल्याही देवस्थानाला एवढी मोठी भेटवस्तू देणे, एरवी किन्नर समाजाकडे बघण्याचा दृष्टिकोन वेगळाच असतो. त्यामुळेच आमच्या किन्नर समुदायाच्या वतीने आम्ही हा मुकुट आई जगदंबे चरणी अर्पण करीत आहोत. या मुकुट अर्पण मिरवणुकीत नाशिक जिल्ह्यातील विविध ठिकाणाहून किन्नर समुदायातील मान्यवर यावेळी उपस्थित होते. तसेच त्यांचा भक्त परिवार सुद्धा यावेळी उपस्थित होता. विविध राजकीय क्षेत्रातील मान्यवर सुद्धा यावेळी उपस्थित होते. पायल गुरु आई भक्त परिवाराने मोठे सहकार्य केले होते. तसेच सत्संग व महाप्रसाद सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी ट्रस्ट कमिटीचेही मोठे मोलाचे सहकार्य लाभले होते.

## विदर्भात सूर्य तळपला, अकोला शहर सर्वाधिक 'हॉट'

**दि.६, नागपूर :** अवकाळी पावसाचे सावट दूर होताच पुन्हा एकदा राज्यात तापमानात वाढ होण्यास सुरुवात झाली आहे. विदर्भातील कमाल तापमानात झपाट्याने वाढ झाली असून अकोला या शहरात सर्वाधिक ४३.२ अंश सेल्सिअसची नोंद करण्यात आली. राज्यातील ही सर्वाधिक तापमानाची नोंद आहे. विदर्भातील इतर बहुतांश शहरांमध्ये देखील कमाल तापमान ४२ अंश सेल्सिअसपेक्षा अधिक नोंदवण्यात आले. उन्हाळ्याची सुरुवात यावेळी दरवर्षीपेक्षा लवकर झाली. होळीनंतर साधारणपणे तापमान वाढण्यास सुरुवात होते. यावर्षी फेब्रुवारीच्या मध्यान्हातच तापमानाने चाळीशी गाठली. मार्च महिना संपण्याआधीच कमाल तापमान ४२ अंश सेल्सिअसपर्यंत पोहचले. तर हवामान खात्याने दोनदा उष्णतेच्या लाटेचा इशारा देखील दिला. दरवर्षी विदर्भात सर्वाधिक तापमानाची नोंद होते. यावर्षी देखील मार्च संपण्याआधीच विदर्भात सर्वाधिक तापमान नोंदवले गेले. अवकाळी पावसामुळे गेल्या आठवड्यात तापमानात तब्बल आठ ते दहा अंश सेल्सिअसने घट झाली. मात्र, अवकाळीचे सावट दूर होताच तेवढ्याच वेगाने तापमानात वाढ झाली.

**सर्वाधिक तापमानाची नोंद !!**

रविवारी विदर्भातील अकोला शहरात सर्वाधिक ४३.२ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. राज्यातील ही सर्वाधिक तापमानाची नोंद आहे. ब्रम्हपुरी येथे ४२.९ अंश सेल्सिअस तर अमरावती व चंद्रपूर येथे ४२.६ अंश सेल्सिअस इतकी कमाल तापमानाची नोंद झाली. यवतमाळ येथे ४२.४ अंश सेल्सिअस तर उपराजधानी नागपूर येथे ४२.२ अंश सेल्सिअस तापमान नोंदवण्यात आले. वर्धा येथे ४१.१ अंश तर राज्यातील सोलापूर शहरात ४१.४ अंश सेल्सिअस तापमान नोंदवण्यात आले. राज्यातील उर्वरित शहरांमध्ये देखील तापमानाने चाळीशी गाठली आहे.

# अक्षराज




## शास्त्रज्ञ डॉ.शंकर आबाजी भिसे

स्वातंत्र्यपूर्व काळातील थोर भारतीय संशोधक डॉ शंकर आबाजी भिसे यांची आज पुण्यतिथी. त्यांचा जन्म २९ एप्रिल १८६७ रोजी मुंबईत झाला. भारताचे एडिसन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या डॉ शंकर आबाजी भिसे या महान शास्त्रज्ञाचा जन्म मुंबईमध्ये एका मॅजिस्ट्रेटच्या घरी झाला. दोनशेच्यावर निरनिराळे शोध लावणारे आणि चाळीसहून अधिक शोधांचे एकस्व संपादन करणाऱ्या डॉ शंकर आबाजी भिसे यांची आज पुण्यतिथी असल्याने त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे तरीही त्यांचा विसर पडणाऱ्यांचीच संख्या यंदाही अधिक असेल. ज्या काळात भारतीय नागरिकांना कमी लेखले जात होते त्याकाळात डॉ भिसे यांनी संशोधनक्षेत्रात अजोड कार्य केले. लहानपणी एकदा भिसे साखर आणायला वाण्याकडे गेले. त्यावेळी वाण्यानी लबाडी करून कमी वजनाची साखर दिल्याचं त्यांच्या लक्षात आलं. याबाबत त्यांनी व्यापाऱ्याला विचारलं असता माझ्या काट्यावर विश्वास नसेल तर आपोआप वजन करणारं यंत्र शोधून काढ. असं वाण्याने त्यांना खोचकपणे म्हटलं. त्यावेळी एक दिवस तुला असे यंत्र देईन अस छोटा शंकर त्यांना आत्मविश्वासाने म्हणाला. लहानपणापासून संशोधनाची आवड असणाऱ्या डॉ भिसे यांनी वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी दगडी कोळशापासून गॅस शुद्ध करण्याचे यंत्र बनवले. १८९७ मध्ये इन्व्हेंटर रिव्हीव अँड सायंटिफिक रेकॉर्ड या मासिकाने स्वयंमापन यंत्र करण्याची एक स्पर्धा जाहीर केली. स्वयंमापन यंत्र म्हणजे साखर, पीठ इत्यादी वस्तूंचे गिर्हाईकाला हवं तेवढं वजन करुन देणारं यंत्र. डॉ भिसे यांनी अशा यंत्राचा आराखडा तयार करून पाठवला. त्यांनी तयार केलेल्या वजन मापन यंत्राच्या आराखड्याला इंग्लंडमध्ये पहिले बक्षीस मिळाले. या स्पर्धेत युरोप आणि अमेरिकेतल्या नामांकित यंत्र शास्त्रज्ञांनी भाग घेतला होता हे विशेष. इंग्लंडमध्ये गेल्यावर त्यांनी छपाईच्या क्षेत्रात अनेक शोध लावले. १९०० साली डॉ भिसे यांचं लक्ष मुद्रण व्यवसायातील यंत्र सामग्रीकडे लागलं. त्या काळी प्रचलित असलेल्या लायनो, मोनो इत्यादी यंत्राची रचना आणि कालमर्यादा यांचा अभ्यास करुन त्यांनी भिसो टाईप या यंत्राचा शोध लावला व त्याचं प्रथम इंग्लंडमध्ये आणि नंतर अमेरिक, जर्मनी, फ्रांस या देशांमध्ये पेटंट घेतले. या यंत्राच्या उत्पादनासाठी सर रतनजी टाटा यांचे सहकार्य मिळवून द टाटा भिसे इन्व्हेशन ही कंपनी १९१० मध्ये लंडन येथे स्थापन केली. पण १९१५ मध्ये ती बंद पडली. त्याच सुमारास दर मिनिटाला साधारण बाराशे अक्षर छापणारं गुणीत मातृका हे यंत्र तयार केलं आणि १९१६ मध्ये विक्रीला आणलं. १९१६ साली भिसे अमेरिकेला गेले तिथे त्यांनी युनिव्हर्सल टाईप क्लस्टर हे यंत्र शोधून काढले आणि अमेरिकेत त्याचं पेटंट घेतले. याशिवाय मुद्रण व्यवसायातली आणखी अनेक यंत्रे त्यांनी तयार केली. १९१० साली साली डॉ भिसे आजारी असताना त्यांच्यावर उपचार करण्यासाठी वापरण्यात आलेलं एक भारतीय औषध फार गुणकारी ठरलं. या औषधाचं रासायनिक पृथःकरण त्यांनी करवून घेतलं आणि त्याच्या गुणकारीपणा आयोडीनामुळे आहे जाणलं. १९१४ साली डॉ शंकर आबाजी भिसे यांनी स्वतःच एक नवीन औषध तयार केले आणि त्या औषधाला बेसलिन हे नाव दिले. हे औषध बाह्येपचारासाठी उपयुक्त ठरले. पहिल्या महायुद्धात या औषधाचा अमेरिकेने मोठ्या प्रमाणात वापर केला. या औषधामुळे पहिल्या महायुद्धात अनेक सैनिकांचे प्राण वाचले. या औषधावर आणखी संशोधन करून आयोडीन घटक असलेलं पण पोटात घेता येईल असं एक औषध नंतर डॉ भिसेंनी तयार केलं या औषधाला ऑटोमेडीयन असं नाव दिलं. हे औषध बऱ्याच रोगांवर उपयुक्त ठरले. पुढे त्यांनी कपडे धुण्यासाठी एक नवे संयुग तयार केले. डॉ भिसे यांनी विद्युत शास्त्रातही अनेक शोध लावले. डॉ भिसे यांच्या साठाव्या वाढदिवशी इंग्लंडमध्ये त्यांचा जंगी सत्कार करण्यात आला. या सुमारास त्यांची महान शास्त्रज्ञ थॉमस अल्वा एडिसन यांच्याशी भेट झाली. एडिसन यांनीही त्यांच्या संशोधन कार्याचा गौरव केला. डॉ भिसे इंग्लंडमध्ये असताना इंग्लंडचे आफ्रिकेशी युद्ध सुरू झाले. स्वयंचलित तोफा काढण्याची विनंती तेथील कारखानदारांनी डॉ भिसे यांना केली. त्यासाठी डॉ भिसे यांना त्यांनी खूप पैसे देऊ केले, पण आपले संशोधन हे विश्वाच्या कल्याणासाठी असून आपल्या संशोधनातून विश्वाचा संहार होऊ नये अशी त्यांची मानवतावादी भूमिका होती. म्हणूनच त्यांनी ही मागणी नम्रतापूर्वक नाकारली. डॉ भिसे यांनी सुमारे २०० शोध लावले. त्यांचे कार्य सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. अमेरिकेतील न्यूयॉर्क येथे ७ एप्रिल १९३५ रोजी या महान शास्त्रज्ञाचे निधन झाले. संशोधन क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य अतुलनीय आहे. शासनाने त्यांच्या या महान संशोधकाच्या कार्याची दखल घेऊन त्यांचा मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देऊन गौरव करावा.

## समाज व्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी प्रशासकीय प्रयत्न

समाजामध्ये वेगवेगळ्या प्रवृत्तीचे माणसं असतात. आपल्या राज्यामध्ये फुले, शाहू, डॉ.बाबासाहेब व आण्णाभाऊ साठे जन्माला आले, जीवन जगले, अनुभवले आणि वास्तविक परिवर्तनवादी विचारांचा पाया घालून इमारत उंच गगनाला भिडणारी नव्हे तर जगाला महान बनवणारी विचारधारा आपल्याला महापुरुषांनी दिली. आणि ती सर्व जगाने आणि आपण माणूस म्हणून स्वीकारली.

आपल्यामध्ये हरितक्रांती, दुग्ध क्रांती, शैक्षणिक क्रांती, आर्थिक क्रांती व सामाजिक क्रांती झालेली आपण पाहतो आणि अनुभवतो सुद्धा. पण आपल्यातील काही जण शिक्षण घेऊन सुशिक्षित होतात का ? या प्रश्न चे उत्तर निरीक्षणातून दिसत नाही.

एखाद्या घराचं बांधकाम पाहायला जाण्याचा योग आला की मी अवश्य जातो. घरकाम करून घेणारा मालक घराबद्दल अतिशय आवडीने माहिती सांगतो. ही खोली आहे, तिची साईज यामध्ये काय – काय भौतिक सुविधा मी बनवणार आहे. आणि शेवटी ही खोली कोणासाठी ? मुलांसाठी, बायकोसाठी, पाहुण्यांसाठी , का आई–वडिलांसाठी? असे प्रश्न ऐकायला मिळतात. या सगळ्या प्रश्नांमध्ये मला शेवटच्या प्रश्नाचे उत्तर जास्त आवडते. ते म्हणजे आई–वडिलांसाठी ही रूम आहे. एखादी इमारत खूप उंच आहे. घरामध्ये कमावणारे माणसं खूप आहेत. पण ज्या घरामध्ये म्हातारे आई–वडील राहण्यासाठी नसतात ती इमारत म्हणजे मला जणू भूत बंगलाच वाटतो. कारण स्वामी तिन्ही जगाचा, आई विना भिकारी.

काही मुले तर आपल्या आई–वडिलांना बायकोचे ऐकून घराच्या बाहेर काढतात. ज्यांनी आपल्या मुलाबाळांसाठी उभ्या आयुष्याला हाडाची काड करून टाकलेली असतात. आज आपली जी परिस्थिती आहे व आपण आज जे सुख समाधान अनुभवतोय त्याचे सारे श्रेय आपल्या आई–वडिलांना जाते. पण ते मानायला तयार नसतात. कारण शिक्षणामुळे माणुस घडतो. हे खरे आहे. पण आभासी व वास्तव यामध्ये असणारा फरक आपल्याला लक्षात न येण्यासारखा झालाय. कारण वृद्धाश्रम, विधवाश्रम व बालकाश्रम हे दिसतात आपल्या डोळ्यांना. एकदा आमची डी.एडला असताना शेवटच्या वर्षी सहल गेली होती.आपापसात चर्चा चालू असताना एका वृद्धाश्रमाकडे पाहून एक वर्गमित्र व वर्ग मैत्रिण म्हणाली यानंतर आयुष्यात आपली भेट झाली नाही तर इथे मात्र नक्की होईल! काय आहे हा विचार? पण आता मात्र जेष्ठ नागरिकांचा निर्वाह व कल्याण अधिनियम २००७ राबवण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मदत मिळणार आहे. या योजनेबाबत निवासी जिल्हाधिकारी ज्योती कदम यांनी सांगितलं की, आपल्याकडे जेष्ठ नागरिक निर्वाह कायदा आणि जेष्ठ नागरिकांच्या हक्काचं संरक्षण हे गरजा पूर्ण करण्यासाठी आहे. ज्या व्यक्तींना मुल त्रास देतात किंवा घरातून बाहेर काढतात तसेच मुल म्हणून कोणतीही मदत करत नाही . त्या अनुषंगाने आपल्याकडे जेष्ठ नागरिक अर्ज करू शकतात . आणि अर्ज केल्यावर त्यांना अश्या प्रकरणा मध्ये मदत केली जावू शकते.

पुण्यासारख्या विद्येचं माहेर घर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शहराची ही अवस्था आहे. तिथं ज्योती कदम यांनी ज्येष्ठ नागरिकांना दिलासा देण्याचं काम केलय. ज्या आई –वडीलांच्या नावावर घर आहे आणि मुलाने बाहेर काढले असेल तर त्यांनी जिल्हा कार्यालयाकडे अर्ज करून आपल घर मिळवता येतं असं सांगून हिमत दिली आणि ते मिळवूनही दिलंय या कामाबद्दल ज्योती ताईंचे कौतूक करण्यासाठी शब्द अपुरे पडतात.

समाजातील सुशिक्षित मंडळी, गावातील तंटा मुक्ती अध्यक्ष, संरपंच, पोलिस पाटील, आणि वकिल मंडळींनी वेळो वेळी या विषयाला अनुसरून भाष्य करावे. आई – वडिलाना मान सन्मान मिळवून देण्यासाठी प्रत्येक बैठकी मध्ये, सार्वजनिक कार्यक्रमात, महापुरुषांच्या जंयतीच्या कार्यक्रमातून, ग्रामसभेतून या विषयाची जाणिव संवेदना जागृत करणे हे प्रत्येक भारतीय नागरिकांचे कर्तव्य आहे असे मला वाटते.

**एकनाथ उर्फ भाऊ पलमटे**
**जिल्हाध्यक्ष लसाकम, लातूर**
**मो. ८३७९०८३१००**

## मानवी संस्कृती धोक्यात आहे का ?

थोर शास्त्रज्ञ अल्बर्ट आईन्स्टाईन म्हणाले होते, तिसऱ्या महायुद्धामध्ये कोणती शस्त्रास्त्रे वापरली जातील याची मला कल्पना नाही, मात्र चौथ्या महायुद्धात दगड आणि काठ्याचा शस्त्र म्हणून वापर होईल. अर्थात या वाक्यात आईन्स्टाईन यांनी शस्त्र स्पर्धा, देशा देशातील संघर्ष त्यातून पुन्हा जग महायुद्धाच्या दिशेने जाईल तर काय होईल याचे भाकित अत्यंत कठोर शब्दात मांडले आहे.जर पुढील महायुद्ध झाले,तर मानव पुन्हा हजारो वर्षे मागे जाईल.आज पर्यंत रचलेले प्रगतीचे मनोरे कोसळून पडतील.भूक, बेरोजगारी,संघर्ष,महामारी यांना पुन्हा मानव जातीला तोंड द्यावे लागेल. एकूणच मानवी संस्कृती धोक्यात येईल...

आज मानवी संस्कृती पुढे अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत. देशा देशातील शस्त्र स्पर्धा ही जागतिक राजकारण आणि अर्थकारण यांचे फलित आहे.मागील महिन्यात अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोल्दोमिर झेलेन्स्की यांच्यात रशिया बरोबर सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर बैठक झाली. त्यांच्यात शाब्दिक चकमकी झाल्या. ट्रम्प म्हणाले, आम्ही तुम्हाला ३५० अब्ज डॉलर्स दिले आहेत, लष्करी उपकरणं दिली आहेत. जर आम्ही लष्करी मदत दिली नसती,तर हे युद्ध दोन आठवड्यात संपले असते. तुम्ही जगाला तिसऱ्या महायुद्धाच्या तोंडावर घेऊन जात आहात. त्यांचे हे संभाषण ऐकून जगाला वाटणारी चिंता पुन्हा एकदा अधोरेखित होते,की देशा देशातील युद्ध ही मानवी संस्कृतीच्या नरड्याला कधी नख लावेल सांगता येत नाही. गाजा पट्टीत मागील वर्षी इस्राईल आणि पॉलिशटाईन मधील हिजबुल्ला, हमास आणि हुती सारख्या संघटना विरुद्ध झालेल्या संघर्षात ४७ हजारापर्यंत निष्पाप लोकांचा बळी गेला. अशाप्रकारे देशा देशातील संघर्ष, वांशिक संघर्ष आणि दहशतवाद हा मानवी संस्कृतीला गिळंकृत करू शकतो.

श्रीलंका सारखा देश चार दशके बहुसंख्य सिंहली आणि अल्पसंख्यांक तमिळ यांच्यातील वांशिक संघर्षात होरपळून निघाला आहे. आता कुठे या देशाला शांतता निर्माण करता आली आहे. अमेरिकेच्या वर्ल्ड ट्रेड सेंटर झालेल्या ९/११ च्या दहशतवादी हल्ल्यानंतर जगाला दशतवादाची तीव्रता जाणवू लागली. भारत पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाविरुद्ध अनेक वर्षे लढत आहे.ज्यांनी दहशतवादाला पोसलं त्यांच्यावर दहशतवाद उलटण्याची उदाहरणे जगाने पाहिली आहेत. आजपर्यंत लाखो लोकांची हत्या दहशतवादी कृत्यांमध्ये झालेली आहे. एखाद्या देशात यादवी युद्ध का सुरू होते? याचा शोध घेतल्यास लक्षात येते की अंतरदेशीय राजकारण, राज्यव्यवस्था,बेरोजगारी, दुजाभावाची वागवणूक अशा अनेक गोष्टीतून देशांतर्गत यादवी युद्ध पुकारले जाते. बांगलादेश,नेपाळ या देशात यादवी माजल्याचे आपण मागील वर्षांमध्ये पाहिली आहे. पाकिस्तान मध्ये बलुचिस्तानमधील सर्वात प्रमुख फुटीरतावादी गटांपैकी एक म्हणून बलोच लिबरेशन आर्मी (बीएलए) उदयास आली आहे. या गटाने मागील महिन्यात पेशावर येथे जाणाऱ्या प्रवासी ट्रेनवर प्राणघातक हल्ला करून लोकांचे अपहरण केले. त्याचप्रमाणे अफगाणिस्तान हा देश अनेक वर्षापासून दहशतवाद, कट्टरवाद यामुळे अजून देखील मध्ययुगातच वावरत असल्यासारखे आपल्याला वाटते.भारताच्या ईशान्येकडील मणिपूर राज्यात मागील तीन वर्षापासून सुरू असलेल्या मैतेई आणि कुकी या दोन समुद्रात मधील संघर्षात २०० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे. मानवी संस्कृती उत्क्रांतवादी असली पाहिजे,परंतु तिच्या उत्क्रांतीला हे सर्व गोष्टी अधोगतीकडे नेत आहेत. माणसा माणसातील आणि मानवी समुदायातील संघर्ष हा नेहमी मानवी संस्कृती विघातक असतो. असा संघर्ष उद्भवू नये अथवा उद्भवल्यास तात्काळ मिटवण्यासाठी जागतिक स्तरावरील संयुक्त राष्ट्र संघटनासारख्या संस्थानी वेळीच हस्तक्षेप केला पाहिजे.

' पर्यावरण ऱ्हास ' हा देखील मानवी संस्कृतीच्या भवितव्या समोरील फार मोठी समस्या बनत आहे.सध्या पृथ्वीचे तापमान वाढत आहे.याचे प्रमुख कारण 'हरितगृह परिणाम' हे आहे. कार्बन डाय–ऑक्साइड, मिथेन, क्लोरोफ्लोरोकार्बन,सल्फर डाय ऑक्साईड, नायट्रोजन ऑक्साईड या वायूची औद्योगीकरणामुळे वातावरणातील प्रमाण वाढत असल्याने, वातावरणात उष्णता साठवून राहण्याची प्रवृत्ती वाढत आहे. याचा परिणाम म्हणून पुढील काळात समुद्रातील पाण्याची पातळी वाढू लागली तर मानवाचे अस्तित्व धोक्यात येईल.पृथ्वीभोवतीच्या ओझोनचा थर विरळ होत आहे. यामुळे देखील मानवी जीवन धोक्यात येऊ शकते. हवा प्रदूषण आणि जल प्रदूषणाचा माणसाच्या आरोग्यावर दूरगामी परिणाम होत आहेत . आजच्या आपल्या ऊर्जेच्या वापराच्या हव्यासाचा परिणाम येणाऱ्या पिढ्यांना भोगावे लागणार आहे. त्यामुळे ' पर्यावरण टिकले,तर मानवी जीवन टिकेल', ही मानसिकता जनसामान्यात निर्माण होणे आवश्यक आहे.

या सर्व जागतिक पातळीवरील समस्या आज मानवी संस्कृतीला धोक्यात घेऊन जात आहेत. याबाबत जागतिक आणि देश पातळीवरील नेतृत्वाबरोबरच सामान्य जणांनी देखील जागरूक होणे आवश्यक बनले आहे.

**– किशोर जाधव, सोलापूर**
**– मो. नं. ९९२२८८२५४१**

## तुका अभंग...

साधी सरळ बोली
तुकारामांचे अभंग
पाण्यावर उठावेत
रे जसे तरल तरंग

गूढ पण अर्थ पूर्ण
तुकारामांचे अभंग
ऐकतां जाणताना
ढवळू जाई अंतरंग

विठू मेणा पालखी
तुकारामांचे अभंग
शब्दांत नादमाधुर्य
वाजती टाळ मृदुंग

फुले वाही विठूपाई
तुक्याचे ते अभंग
भक्तीच्या शक्तीमधे
मन झाले पार दंग

आपणभेटे आपणा
तुकारामांचे अभंग
संत मेळावा रंगला
सुखेसाधतो सत्संग

हिरे माणीक खाणी
तुकारामांचे अभंग
सामान्या लाभलेला
असा दांडगाव्यासंग

**– हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

## मद्यप्राशन करून वाहने चालवू नका..!

मी कार्यालयातून घरी येत असताना, ऐन चौकात मद्यधुंद अवस्थेत एक दुचाकी स्वार दुचाकी चालवतांना दिसला. अतिप्रमाणात मद्यप्राशन केलेले असल्यामुळे तो अक्षरशः इकडून – तिकडे झोकांडया घेत होता.त्याच्या समोर एक वृद्ध लुना चालवणारे आजोबा व एक महिला स्कुटी होते चालवत होते कदाचित नव शिकाऊ असावी. म्हणून हळू व त्याच्या त्यांच्या शिस्तीत त्यांचे वाहन चालवत होते, परंतु हा मद्यधुंद मद्यपी दुचाकी चालक नियमांचे पालन न करता अगदी बेभान पद्धतीने दुचाकी चालवत होता. मधेच कर्णकर्कश हॉर्न वाजवत होता व त्याच्या म्हणण्या प्रमाणे त्याला सर्वांच्या अगोदर व पुढे निघू द्यावं असा त्याचा जबर प्रयत्न करत होता. त्यासाठी तो तशीच दुचाकी चालवत होता. काही अंशी ते यशस्वीही झाले कारण महिला, वृद्ध व सुशिक्षित हे त्यांच्या नियमा प्रमाणे चालवत होते व त्याच्या बेशिस्त अन कर्णकर्कश आवाजामुळे त्याला जाण्यास वाट मोकळी करून देत होते. कदाचित तस–तसा त्याला वाहन वेगात चालवण्याचा जोर येत होता.मात्र बघा! काय योगायोग अचानक समोरून जड वाहन आले. रस्ता अरुंद असल्यामुळे सगळ्यानांच वाहनाची गती कमी करावी लागली. तो ते जड वाहन बघून घाबरला अन दुचाकी थांबवली. सगळ्याप्रमाणे बाजूला घेतली. म्हणून तेवढ्या वेळेत माझे त्याच्यापर्यंत पोहोचणे शक्य झाले व त्याला मी गाडी बाजूला घेण्यास सांगितले.

मला त्या मद्यधुंद अवस्थेत व्यक्तीची अवस्था बघून दोन शब्द बोलल्याशिवाय राहवलेच नाही. मी त्याला शांततेत समजून सांगाण्याच्या उद्देशाने त्याच्यापर्यंत गेलो अन, म्हटले दादा अहो! असे मद्य प्राशन करून वाहन चालवू नका. काही वेळ तो माझ्याकडे रागाने बघू लागला. कारण त्याने मद्यप्राशन केलेले असल्यामुळे त्याच्या डोळ्यात मस्ती, धुंद फणफणत होती. व केवळ मान हलवून उडवा उडवीचे उत्तर दिल्यासारखा प्रतिसाद देत होता. राहणीमानावरून तसा तो शिक्षित असावा परंतु मद्याच्या धुंदीमुळे तो मनुष्यवत नव्हताच....!

जड वाहन मागे पुढे करून पुढे जाण्यासाठी वाट मोकळी होईपर्यंत थोडा वेळ लागला. तेवढ्यात त्याची दुचाकी बंद पडली.परत मी त्याच्यासबत बोलू लागलो. बंद पडलेली दुचाकी मात्र त्याच्याकडून परत चालू होईना. चालू करण्यासाठी दुचाकीची किक मारणे सुद्धा त्याला शक्य नव्हते परंतु, चालू करण्यासाठी तो केवीलवाने प्रयत्न करत होता. मी तेवढ्या वेळेत त्याला बोलण्याची संधी सोडलीच नाही.आता मात्र मी भावनिक विषयाला हात घातला. भाऊ ! ते समोरचे लुना चालवणारे आजोबा अन स्कूटी चालवणाऱ्या त्या ताई, तुमच्या अशा बेशिस्त वाहन चालवल्यामुळे व कर्णकर्कश आवजामुळे घाबरले अन घाबरून गाडीवरून खाली पडले असते तर..! यापैकी जर तुमचे बाबा किंवा बहीण पत्नी असते तर...! अन हो ! तुमचे लग्न झालेले असेल तर, यावेळेला घरी तुमची पत्नी लेकरं वाट पाहत असतील. आई बाबा तुमची वाट बघत असतील. भाऊ ! तुम्ही माझ्या मोठे भावासारखे आहात. कृपया असे मद्य प्राशन करून, दारू पिऊन वाहन चालवू नका.

यदाकदाचित तुमचे बरे वाईट झाले तर......! एवढं सर्व मी त्याची किक मारण्याची अवस्था व जड वाहनाला जाण्यासाठी वाट मोकळी होई प्रयन्त बोलूनच टाकले. कारण मला थोडा त्याचा रागही आलेला होता त्यामुळे मी भडाभडा बोलायचे ठरवले होतेच. मी फारसा ज्ञानी नाही किंवा फार मोठा समाजसेवकहीं मात्र, तेथील सर्व प्रसंग डोळ्यासमोर घडलेला बघून नक्कीच ज्याला सामाजिक भान आहे तो बोलणारच..! आता मात्र तो एकदम भावनिक झाला. प्रयत्न करून चालू न झालेली दुचाकी त्याने परत सुरू करण्याचे थांबवले.गाडीच्या हँडलचे हात सोडले. अन हात जोडून मला बोलू लागला.नाही दादा! तुम्हीच मोठे आहात. चुकले माझे, यानंतर मी काळजी घेईन.अश्या त्या नशेतील वेड्या वाकड्या, भाषेत गुंतत–गुंतत बोलू लागला. माहितीये तो सध्या मद्यधुंद अवस्थेत आहे.मद्य प्राशन करणारे अतिशय भावनिक नाटक हि करू शकतात, मात्र जेव्हा त्याच्या स्वतःच्या कुटुंबांचा विषय काढला.तेव्हा तो शांत झाला. क्षमायाचनेसारखे बोलू लागला. एक विचार करण्यासारखा विषय आहे कि, जर तो मद्यप्राशन करून घरचा रस्ता लक्षात ठेवुन, घराच्या दिशेने जाण्याचा प्रयत्न करतोय, तर मी बोलल्यामुळे त्याच्या कुटुंबातील,घरातील सदस्यांचे चेहरे नक्कीच त्याच्या डोळ्यासमोर आले असतील.

अशाप्रकारे,माझ्या तरुण बांधवांनो, मद्यप्राशन करून कोणतेही वाहन चालवू नका. मद्याच्या नशेमुळे धुंद, झोप, चक्कर यातून डुलकी किंवा बेशिस्त वाहन चालवण्यामुळे झालेली चूक, तुमच्या बरोबर इतरांचा सुद्धा बळी घेऊ शकते. मद्यप्राशन करून बेशिस्त वाहन चालवल्यामुळे, वाहन चालवण्याची कमाल गतीमर्यादा ओलांडल्या मुळे, ज्यांची काही चूक नाही. त्यांनासुद्धा विनाकारण अपघातास बळी पडावे लागते. तुमच्यासारखेच त्याचे सुद्धा कुटुंब आहे. घरी तुमच्यासारखीच त्यांचीही कुणीतरी वाट पाहत असेल. म्हणून वाहतुकीचे नियम पाळा. मद्यप्राशन करून वाहने चालवू नका.

**श्री.विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ जि.बुलडाणा.**
**मो.९७६३२८२०७७**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात


## आर्ट व्हिजन मार्फत मुंबई येथे १३ वे वार्षिक समूह राज्यस्तरीय चित्र प्रदर्शन



**अक्षराज : आदिनाथ देशमुख**

**दि.०६, मुंबई :** आर्ट व्हिजन मुंबई यांचे मार्फत दरवर्षी प्रमाणे याही वर्षी चित्र प्रदर्शन भरविण्यात येते आहे. या वर्षी १३ वे वार्षिक समूह राज्यस्तरीय चित्र प्रदर्शन आणि बक्षीस वितरण समारंभाचे सोमवार, दि.०७ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११ ते ७ या वेळेत पू.ल.देशपांडे कला दालन रविंद्र नाट्य मंदीर येथे आयोजित करण्यात आले आहे. या चित्रकला प्रदर्शनात महाराष्ट्रातून कला शिक्षक सहभागी झाले आहेत. आर्ट व्हिजन मार्फत काही महिन्यापूर्वी या सर्व कला शिक्षकांसाठी फलक लेखन स्पर्धा आयोजित केली होती. त्या स्पर्धेतील विजयी स्पर्धकांना बक्षीसे देऊन गौरविण्यात येणार आहे. तसेच राज्यस्तरीय गुनिजन कला पुरस्कार देण्यात येणार आहे. या चित्र प्रदर्शन आणि पुरस्कार वितरण समारंभाला महाराष्ट्र विधान परिषदेचे आमदार ज.मो.अभ्यंकर, अनिल बोरनारे अध्यक्ष मुंबई मुख्याध्यापक संघटना, मीरा चाफकर अध्यक्ष कला अध्यापक संघ मुंबई, यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार आहे. सदर चित्रकला प्रदर्शन व बक्षीस वितरण समारंभाला महाराष्ट्रातील जास्तीत जास्त कला शिक्षकांनी उपस्थित रहावे असे आवाहन आर्ट व्हिजन मुंबई चे प्रमुख तसेच रत्नागिरी तालुक्यातील तरवळ या ग्रामीण भागातील कला शिक्षक व सध्या मुंबई येथे वास्तव्यास असलेले अर्जुन माचिवले, तसेच त्यांचे सहकारी महेश कदम, रियाज काझी, मनोज सनानसे यांनी केले आहे.

## वीज 'मीटर' भिंतीला की; ग्राहकाच्या खिशाला, नव्या मीटरची 'स्मार्ट' वसुली



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.०६, मुदखेड (नांदेड) :** ग्रामीण भागात महावितरणकडून ग्राहकांचे जूने मीटर नवीन मीटर बसविण्याचे तुघलकी फर्मान काढले आहे. नव्या मीटरच्या नावाखाली स्मार्ट वसूली चालू केल्याने मीटर भिंतीला की ग्राहकांच्या खिशाला? अशा आर्थिक विवंचनेत ग्राहक अडकले असून वीज विभागातील खाजगी कंत्राटदार कायद्याचा धाक दाखवून जास्तीचे पैसे उकळत असल्याच्या तक्रारी दिवसेंदिवस वाढत आहे तालुक्यातील बारड येथे ३३ के.व्ही उपकेंद्र कार्यान्वित आहे. उपकेंद्राचा कारभार शहर व ग्रामीण अशा दोन केंद्रातून स्वतंत्र कार्यालयाच्या माध्यमांतून चालतो. त्याकरिता दोन अभियंता यांची नियुक्ती आहे. ग्रामीण केंद्र अंतर्गत पांढरवाडी, हिस्सा पाथरड या गावात नवीन मीटर बसविण्यासाठी ग्राहकांकडून जास्तीचे पैसे उकळले जात आहेत. नवीन मीटर घेण्यासाठी शहरी भागात १६०० रु. तर ग्रामीण भागासाठी ८७० रु भरावे अशी तरतूद आहे. पैसे अदा करूनही नवीन मीटर बसविण्यासाठी वीज कार्यालयात ग्राहकांना चकरा माराव्या लागत आहेत. मीटर बसविताना जवळपास ५ हजारापर्यंत मागणी केल्या जात असल्याचे तक्रारी असून यांतून खाजगी कंत्राटदार वीज ग्राहकांची गळचेपी करीत आहेत अशी चर्चा आहे.

शहरी भागात एकूण वीज ग्राहकांची संख्या २ हजारांच्या जवळपास आहे. शहरात महावितरण कंपनीच्या वतीने आता स्मार्ट मीटर बसविण्याची प्रक्रिया सुरू आहे. एनसीसी कंपनीला कंत्राट दिले असून तालुका निहाय स्मार्ट मीटर बसविले जात आहे. मीटर बसवितांना प्रत्येक वीज ग्राहकांना खोडखाड केल्याची धमकी देऊन दंड वसूली ही करण्याचे प्रकार चालू आहेत असे ग्राहक प्रतिक चवरकर यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. स्मार्ट मीटर जास्तीचे पैसे घेण्याचा कारभार सर्रास सुरू आहे. या प्रकरणाची आता सखोल चौकशी करून संबंधितांवर ठोस कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

## आजपासून मुक्रमाबाद येथे यात्रा महोत्सवानिमित्त अखंड शिवनाम सप्ताह



**अक्षराज : अशोक लोणीकर**

**दि.०६, मुखेड (नांदेड) :** मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद येथील यात्रा महोत्सवानिमित्त अखंड शिवनाम सप्ताह ग्रंथराज परमरहस्य पारायण सोहळा श्रीक्षेत्र महादेव मंदीर येथे सदुरु राष्ट्रसंत ष.ब्र.डॉ. शिवलींग शिवाचार्य महाराज अहमदपूरकर (राजुरमठ) यांच्या कृपाशीर्वादाने सप्ताहाचे आयोजन सोमवार, दिनांक ०७ एप्रिल २०२५ पासून ते सोमवार, दि.१४ एप्रिल २०२५ पर्यंत आयोजित करण्यात आले आहे.

शनिवार, दि.१२एप्रिल रोजी पहाटे ५ वाजता श्री ची रथातुन भव्य मिरवणुक व भस्म उधळण होणार आहे. सप्ताहातील दैनंदिन कार्यक्रमात पहाटे ४ ते ६ शिवपाठ, ६ ते ८ रुद्राभिषेक, ८ ते ११ परमरहस्य पारायण, स.११ ते १ गाथा भजन, रात्री ९ ते १२ शिवकिर्तन, १२ ते ४ शिवजागर होणार आहे.

या सप्ताहासाठी नामवंत कीर्तनकारांना पाचारण करण्यात आले असून त्यात शि.भ.प.कैलास महाराज डोंगरगावकर, शि.भ.प.भूषण स्वामी वखारीकर, ष.ब्र १०८ सद् गुरु सिद्धचैतन्य शिवाचार्य महाराज बुलढाणा, .ब्र १०८ सद् गुरु विश्वचैतन्य शिवाचार्य महाराज आष्टीकर, .ब्र १०८ सद् गुरु संगणबसव शिवाचार्य महाराज निलंगेकर, शि.भ.प. मोहनराव कावडे महाराज हासनाळीकर, शि.भ.प. काशिनाथ महाराज सुंदाळे, शि.भ.प. बसव कथाकार शिवानंद महाराज हैबतपुरे उदगीर, सोमवार, दि.१४ रोजी सकाळी १० वाजता ष.ब्र १०८ सद् गुरु वेदांताचार्य दिगंबर शिवाचार्य महाराज वसमतकर याचे जाहीर कीर्तण होणार आहे. त्यानंतर महाप्रसाद सुरुवात होणार आहे.

मंगळवार, दि.१५ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ६ वाजता श्री ची पालखीतून मिरवणूक काढण्यात येणार आहे.मुक्रमाबाद येथील यात्रा महोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या सप्ताह, रथोत्सव, भव्य अग्निकुंड सोहळा व यात्रा महोत्सवाचा मुक्रमाबादसह परिसरातील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन महादेव मंदिर समिती व मंदिराचे मुख्य पुजारी राचप्पा स्वामी यांनी केले आहे.

# शिर्डी विमानतळ परिसरातील दुहेरी हत्याकांडातील आरोपींना अटक

## चोरीच्या उद्देशानेच बाप-लेकाला केले ठार



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०६, राहाता (अहिल्यानगर) :** कोपरगाव तालुक्यातील काकडी शिवारा असणार्या दिघे वस्तीवर शनिवारी पहाटेच्या सुमारास अज्ञात हल्लेखोरांनी भोसले कुटुंबावर घरात घुसून वडिल व मुलाची निर्घृण हत्या केली. या मारहाणीत आई गंभीर जखमी आहे. या दुहेरी हत्याकांडामुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली. पोलिसांच्या तपास पथकांनी तांत्रीक विश्लेषणाच्या आधारे गुन्हयाचा तपास करत असताना सदरचा गुन्हा करणारे दोन संशयीत इसम टेम्पोमधुन सिन्नर मार्गे नाशिककडे जात असल्याबाबत खात्रीशीर माहिती मिळाली.

पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या माहितीवरून पळशी टोलनाका, सिन्नर, जि.नाशिक येथे सापळा रचुन संशयीत इसमांचा शोध घेऊन एका टेम्पोमध्ये पाठीमागील बाजुस बसलेले संशयीत दोन इसम मिळून आल्याने संदीप रामदास दहाबाड (वय १८), जगन काशिनाथ किरकिरे (वय २५) दोन्ही रा.तेलीम्बरपाडा, ता.मोखाडा, जि.पालघर अशांना ताब्यात घेतले. ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीतांना विश्वासात घेऊन गुन्हयाचे अनुषंगाने विचारपूस केली असता संदीप रामदास दहावाड याने त्याचे साथीदारासह रात्री १२.३० वा.सुमारास काकडी विमानतळ परिसरामधील एका घरामध्ये जाऊन दोन तीन जणांना लाकडी दांडक्याने व फावडयाने मारहाण केली व चोरी केल्यानंतर पळून जात असल्याबाबत माहिती सांगितली.

ताब्यात घेण्यात आरोपी संदीप रामदास दहाबाड व जगन काशिनाथ किरकिरे, रा.तेलीम्बरपाडा, ता.मोखाडा, जि.पालघर यांना गुन्ह्याचे तपासकामी राहाता पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले असुन पुढील तपास राहाता पोलीस करीत आहे.

# कर्जुलेहर्या येथिल हरेश्वर महाराज अखंड हरीनाम सप्ताहास सुरुवात

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस डॉ. आरोटे यांची देवस्थानला सदिच्छा भेट



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०६, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील कर्जुलेहर्या येथील श्री हरेश्वर महाराज उत्सवानिमीत्त भागवत पारायण व जगद्गुरु संतश्रेष्ठ तुकाराम महाराज ३७५ वा वैकुंठ गमन सोहळा तसेच ७२ वा अखंड हरीनाम सप्ताहास दि.०२ एप्रिल २०२५ पासून प्रारंभ झाला आहे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गावकरी वृत्तपत्र समूहाचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी स्वयंभू हरेश्वर देवस्थानला सदिच्छा भेट दिली.

यावेळी देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष शिवाजीराव शिर्के यांनी डॉ.विश्वासराव आरोटे यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला. यावेळी देवस्थान ट्रस्टचे पदाधिकारी व गावातील ग्रामस्थ उपस्थित होते. वै. तुकाराम महाराज शास्त्री व स्व. विष्णू शिंदे यांनी गावासह मंदिर परिसरासाठी भरीव योगदान दिले. ह.भ.प.डॉ. नारायण महाराज जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली या सप्ताहाच्या कालावधीमध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन देवस्थान समितीच्या वतीने करण्यात आले आहे. अखंड विणा, पहाटे ४ ते ६ काकडा, सकाळी ६ ते १० भागवत पारायण, स.१० ते १२ गाथा भजन, सायं ३:३० ते ५:३० संत चरित्र कथा जगदगुरु संतश्रेष्ठ तुकाराम महाराज गाथा अभंग निरुपण, दु.५:३० ते ६:३० हरिपाठ रात्री ७ ते ९ नामवंत किर्तनकारांचे हरिकीर्तन नंतर महाप्रसाद व हरीजागर असा दिनक्रम चालणार असून काल्याच्या कीर्तनाचे या सप्ताहाची सांगता होणार आहे.

राजस्थानातील मकराना या दगडाचा वापर करून हरेश्वर मंदिराचा जिर्णोद्धार करण्यात आला आहे. मंदिराचा परिसर देखणा आणि निसर्गरम्य आहे. कौलारू बांधकाम असणारे जुने मंदिर आणि त्याचे सभागृह कालबाह्य झाल्याने गावकऱ्यांनी नवीन मंदिर जिर्णोद्धाराचे आणि सभागृह उभारण्याचे काम हाती घेतले व ते पूर्ण केले ही बाब कौतुकास्पद आहे. आपणही सामज्याचे काही देणे लागतो त्यामुळे मी या देवस्थानला महाशिवरात्री निमित्त होणाऱ्या महाप्रसादासाठी २ पोते साबुदाणा देत आहे.

**- डॉ. विश्वासराव आरोटे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस**

# श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात रामनवमी जन्मोत्सव साजरा



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०६, पंढरपूर :** चैत्र शुध्द नवमीला प्रतिवर्षीप्रमाणे विठ्ठल सभामंडपामध्ये श्री रामनवमी जन्मोत्सव सकाळी १० ते १२ या वेळेत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. श्री विठ्ठलास उपवासाचा महानैवेद्य दाखवून दुपारी १२ वा. पांढरा पोशाख, पागोटे व साखरेचा हार परिधान करून श्रींच्या अंगावर गुलाल टाकून राम जन्मोत्सव सोहळा पार पडल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

यावेळी राम जन्माची कथा होऊन प्रसाद म्हणून सुंठवडा वाटप करण्यात आला. तसेच श्री. विठ्ठल महाराज देहूकर फड (बिद्रीकर मंडळी) ह.भ.प. श्रीकांत महाराज पातकर, पंढरपूर यांचे श्री.विठ्ठल सभामंडप येथे श्री. रामनवमी जन्मोत्सवाचे कीर्तन संपन्न झाले. यावेळी मंदिर समितीच्या सदस्या श्रीमती शकुंतला नडगिरे, विभाग प्रमुख पांडुरंग बुरांडे व कर्मचारी उपस्थित होते. याशिवाय, रामनवमी जन्मोत्सवा निमित्त श्री संत तुकाराम भवन येथील अन्नछत्राच्या भोजनप्रसादामध्ये गोड पदार्थाचा समावेश करण्यात आला होता, सुमारे २ हजार भाविकांनी प्रसादाचा लाभ घेतल्याचे व्यवस्थापक मनोज शोत्री यांनी यावेळी सांगितले.

## श्री साईमंदिर वर्धापन दिनानिमित्त मंगळवारी भव्य शोभायात्रा

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०६, नागपूर :** सावनेर तालुक्यातील भानेगाव येथील श्री साई मंदीर वर्धापन दिनानिमित्त पालखी सोहळा व भव्य शोभयात्रेचे आयोजन मंगळवार, दिनांक ०८ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत करण्यात आले आहे. यासंदर्भात मंदिर व्यवस्थापन कमिटीने जय्यत तयारीचा आढावा घेतला असून शोभायात्रा मार्गावर ठिकठिकाणी जोरदार स्वागत करण्यात येणार आहे. श्री साईबाबा मूर्तीची प्राणप्रतिष्ठा रामनवमीच्या तिसऱ्या दिवशी १७ एप्रिल २००७ साली भानेगाव येथील श्री साई मंदिरात करण्यात आली. मागील अनेक वर्षांपासून श्री साई मंदिर वर्धापन दिनानिमित्त पालखी सोहळा व भव्य शोभयात्रेचे आयोजन करण्यात येत आहे.

श्री साई मंदिर वर्धापन दिनानिमित्त मंगळवारला पहाटे ४.३० वाजता श्री साईचे मंगल स्नान, ५ वाजता श्री साईचा अभिषेक, ६ वाजता श्री साईची आरती, १० वाजता भजन, दुपारी १२ वाजता मध्यान्ह आरती, २ वाजता कीर्तन, सायंकाळी ६ वाजता श्री साईची आरती ६ ते रात्री १०.०० शोभायात्रा आदि कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शोभायात्रेत भजन मंडळ, ११ घोडे, १० डिस्को लाईट बग्गी, बाबूळगाव बँड, आकर्षक रोषणाई, लेझीम पथक, कार्टून, राम लक्ष्मण सीता, भगवान महाविर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रमाई, छत्रपती शिवाजी महाराज, बाजीराव पेशवे, तानाजी मालुसरे, झाशीची राणी, जिजाऊ, मावळे, श्री साईबाबा आदि सजीव पात्र सामील करण्यात आले आहेत. शोभायात्रा श्री साई मंदिर भानेगाव, शिक्षक कॉलनी, उपासे ले-आऊट, नवीन बिना, आझाद चौक प्रकाश नगर, राम मंदिर, पोलीस स्टेशन, रेल्वे चौकी मुख्य बाजारपेठ, अन्नामोड आदि परिसरातून भ्रमण करून श्री साई मंदिर भानेगाव येथे समापन करण्यात येणार आहे. यावेळी महाप्रसाद वितरित करण्यात येणार आहे. शोभायात्रेत मोठया संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन श्री साई मंदिर व हनुमान मंदिर पंच कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.

## चैत्री यात्रेसाठी चंद्रभागा नदी पात्रात सोडले पाणी

### भाविकांना चंद्रभागा नदीत करता येणार पवित्र स्नान



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०६, पंढरपूर :** चैत्र शुध्द एकादशी ०८ एप्रिल २०२५ रोजी असून यात्रा कालावधी दिनांक ०२ ते १२ एप्रिल २०२५ रोजी आहे. या यात्रा कालावधीत श्री विठ्ठल-रुक्मिणी दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक येतात. वारकऱ्यांसाठी चंद्रभागेचे स्नान फार पवित्र मानले जाते. श्री विठ्ठल- रुक्मिणीमातेचे दर्शन घेण्यापुर्वी भाविक चंद्रभागा स्नान करतात. तसेच चैत्र महिन्यात कावडी स्नानासाठी देखील कावडी घेऊन मोठ्या प्रमाणात भाविक येतात.भाविकांना चंद्रभागाभागा नदी पात्रात पवित्र स्नान करता यावे. यासाठी दगडी पूला जवळील नगरपरिषदेच्या बंधाऱ्यातून २५० क्युसेक्सने पाणी सोडण्यात आले आहे. चंद्रभागा नदीपात्रातील पाण्याची पातळी कमी झाल्याने व जास्त काळ पाणी साठून राहिल्याने पाण्यावर शेवाळे येऊन पाणी जास्त काळ साठल्याने पाणी घाण झाले होते. नदीपात्रातील शेवाळे व घाण पाणी वाहून जावे यासाठी पिराच्या कुरोली येथील बंधाऱ्यातून गुरसाळे येथील बंधाऱ्यात व गुरसाळे येथील बंधाऱ्यातून दगडी पूला शेजारी असलेल्या बंधाऱ्यात पाणी घेऊन ते पाणी चंद्रभागा नदीपात्रात २५० क्यूसेक्सने सोडण्यात आले. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिलेल्या सूचनेनुसार उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांनी कार्यकारी अभियंता भीमा पाटबंधारे विभाग व पंढरपूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांच्याशी चर्चा करून नगर परिषदेच्या बंधारे मधून चंद्रभागा नदी पात्रामध्ये पाणी सोडण्यात आले. नगर परिषदेच्या बंधार्यामधून भाविकांच्या सोयीसाठी चंद्रभागा नदीपात्रामध्ये पाणी सोडण्यात आल्याने व चैत्री यात्रेमध्ये भाविकांना स्नानासाठी पाणी उपलब्ध झाल्याने भाविकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

# वार्षिक राशिफल मेष राशी २०२५




**मेष रास –** २०२५ हे वर्ष मंगळ ग्रहाचे वर्ष म्हणून मानले जाते. तसेच मेष रास ही मंगळाचीच रास आहे. मेष राशीचे राशीचे मंगळ हा ग्रह करतो. व मेष राशी ही राशीचक्रातली सर्वात पहिली रास आहे. २९ मार्च २०२५ पासून शनी महाराजांची साडेसाती या मेष राशीला सुरू होतेय. पुढे साडेसात वर्ष ही साडेसाती मेष राशीला सुरू असणार आहे. साडेसाती सुरू होत असताना पहिल्या अडीच की मध्ये शनि महाराज हे राशीपासून बाराव्या स्थानात असतात. दुसऱ्या अडीचकी मध्ये आपल्याच राशीत असतात. व तिसऱ्या अडीच की मध्ये ते आपल्या राशीपासून पुढच्या राशीत जातात. सध्या शनिमहाराज हे मेष राशि पासून बाराव्या स्थानात आले आहेत. त्यामुळे येणाऱ्या अडीच वर्षात मेष राशीच्या लोकांना आरोग्यदृष्ट्या संमिश्र फळे मिळणार आहेत. त्यामुळे ऍसिडिटी, डोकेदुखी, यासारखे त्रास वाढू शकतील. पोटदुखी सुद्धा होऊ शकते. त्यामुळे पोटाची काळजी घेणे जरुरीचे आहे. त्वरित डॉक्टरांचा सल्ला घेणे योग्य ठरेल. शैक्षणिकदृष्ट्या हे वर्ष मेष राशीला उत्तम आहे.

ज्यांना परदेशात जाऊन शिक्षण घेण्याची इच्छा असेल त्यांना ते शक्य होईल व अपेक्षेपेक्षा जास्त चांगले फळ त्यांना या वर्षात शैक्षणिक दृष्ट्या मिळेल. या काळामध्ये तुमच्या अध्ययनाचा स्तर चांगला राहील. पण घरापासून दूर राहून शिक्षण घेणाऱ्या मुलांना होमसिकनेस येईल. उलट पक्षी व्यापाऱ्यांना मात्र झुकेगा नही साला ही प्रवृत्ती ठेवून अजिबात जमणार नाही. व्यवसायामध्ये फटकळपणा, समोरच्याचा अपमान अशा गोष्टींवर नियंत्रण ठेवावे लागेल. ग्राहकांशी बोलताना थोडीशी मवाळ भूमिका घ्यावी लागेल. कारण काहीही कारण नसताना केवळ तुमच्या बोलण्यामुळे तुमच्या हातून तुमच्या व्यापारातील एखादी मोठी डील निसटून जाण्याची शक्यता आहे. तुमच्या व्यापारासाठी नवीन जागा, ऑफिस तुम्हाला खरेदी करायचे असेल किंवा जमीन, घर खरेदी करायचे असेल तरीही साडेसाती असूनही हे सर्व तुम्ही सहजासहजी प्राप्त करू शकाल. तुमची आवक वाढेल पण त्याचबरोबर खर्च व कर्जही वाढतील. मेष राशीच्या लोकांना नवीन नवीन कामाच्या संधी देखील उपलब्ध होतील पण त्याच संधीचं सोनं करावयास मात्र तुम्हाला शिकावं लागेल. नोकरदार व्यक्तींसाठी शनिपालटानंतर वरिष्ठांकडून काही समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे तसेच मे महिन्यानंतर राहू पालटही होतोय. त्याचीही अनुकूलता तुम्हाला लाभेल पण जास्त मेहनत करणे व कमी फळ मिळणे ही स्थिती हो निर्माण होऊ शकते. पण तरीही नोकरीमध्ये बदल, प्रमोशन बदली हे चांगले बदलही घडू शकतात. चांगल्या नोकरीच्या किंवा सरकारी नोकरीच्या शोधात असाल तर तुम्हाला चांगली नोकरी नक्की मिळेल. आर्थिक दृष्ट्या हे वर्ष संमिश्र असेल. वर्षाच्या मध्यांना पर्यंत भरपूर धनलाभ होईल. मध्यान्नानंतर मात्र जबाबदाऱ्या वाढतील. प्रॉपर्टी, गाडी खरेदीचे योग आहेत त्यामुळे कर्जही वाढतील व तुमची आवक व तुमचा खर्च यामध्ये ताळमेळ घालताना तुमची दमछाक होईल. तुमचे कौटुंबिक जीवन व तुमचे प्रेम जीवन यावर्षी एकदम उत्तम राहील. तुम्ही बोलण्यामध्ये तडफदार असल्याने पार्टनर सोबत वाद विवाद होतील. जून व जुलै या दोन महिन्यानंतर तुमच्या परिवारासोबत एखादी लांबची ट्रिप किंवा परदेशवारी होऊ शकते. त्यामुळे खर्चाचे प्रमाण वाढेल. तुम्हाला नातवंडाचे तोंड पाहण्याचा योग यावर्षी नक्की आहे. विवाह उत्सुक असाल तर विवाह ही जमेल. प्रेमविवाह करावयाचा असेल तर प्रेमविवाह ही होऊ शकतो तुमच्या पार्टनर सोबत किरकोळ मतभेद देखील होतील. भूमी भवन वाहन सुख सर्व मिळेल. तुम्हाला धंदा व्यवसायात पार्टनरशिप करायची असेल तरीही बिनधास्त करू शकता. पण इललीगल असे काहीच करू नका. कुठल्याही कामात सरकारी पेपर्स नीट वाचा.

**उपाय –** गणपती बाप्पाची उपासना करा. शक्य झाल्यास चतुर्थीचा उपवास करा. दररोज अथर्वशीर्ष वाचन करा. कन्या भोजन करा.

**– देवयानी कुलकर्णी.**
**खारघर (रायगड)**

# थोडक्यात

## पालकमंत्री टास्क फोर्सची आढावा बैठक संपन्न



**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.०५, पालम (परभणी) :** परभणी जिल्ह्याचा सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने व केंद्र सरकारच्या व राज्य सरकार यांच्या योजना तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी पालक मंत्री महोदय यांच्या संकल्पानेतून पालकमंत्री टास्क फोर्स स्थापन करण्यात आला आहे. या टास्क फोर्स ची पालम येथील तहसील कार्यालयात तहसीलदार कैलासचंद्र वाघमारे यांच्या उपस्थितीत आढावा बैठक संपन्न झाली. पहिल्या टास्क फोर्स अंतर्गत पालम तालुक्याातील ८ गावे समावेश करण्यात आली आहेत. प्रत्येक गावांना एक पालक अधिकारी यांची नेमणुक करण्यात आलेली आहे. अनुक्रमे गावांची नावे व पालक अधिकारी शेखराजूर कैलासचंद्र वाघमारे, तहसीलदार पालम, लाडंकवाडी उदयसिंग शिसोदे, खडी आबासाहेब देशमुख, धनेवाडी आशीतोष चिंचालकर मुख्याधिकारी नगर पंचायत पालम, खोरसराजेश्वार पवळे नायब तहसीलदार, पेठशिवणी भागवत तेलभरे, बनवस विनोद पवार, शिवाजी गायकवाड यांची नेमणुक करण्याहत आलेली आहे.

या बैठकीस सर्व पालक अधिकारी, सर्व तालुकास्तरीय अधिकारी व सर्व गावांचे ग्रामस्तरीय अधिकारी, मंडळ अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक, आरोग्य सेवक, अंगणवाडी ताई, आशा वर्कर, मुख्याध्यापिका, पोलीस पाटील, रास्त भाव दुकानदार यांची उपस्थिती होती. सदर बैठकीत पालक अधिकारी व सर्व विभागाच्या ग्रामस्तरीय अधिकारी यांनी सर्व प्रथम प्रत्येक गावांची योजना निहाय माहीती तयार करावी. पालकमंत्री यांनी दिलेल्या निर्देशानुसार गावात जाऊन गावकऱ्यासोबत चर्चासत्र आयोजीत करावे. लोकसहभाग व सर्व विभागाच्या कर्मचारी यांची मदत घेऊन केंद्र शासन व राज्य शासनाच्या प्राधान्य क्रमांच्या योजनांची अंमलबजाणी करणे बाबत कैलासचंद्र वाघमारे यांनी मार्गदशन केले.

## रामदास भिकाजी शिंदे यांचे दुःखद निधन



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०६, विंचूर (नाशिक) :** विंचूर येथील सुतार समाजातील एक सामाजिक कार्यकर्ते, जेष्ठ नागरिक कै.रामदास भिकाजी शिंदे (बय मिस्तरी) यांचे वयाच्या ७८ वर्षी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून आणि नात असा परिवार आहे.


## तुर्भे स्थानकासमोरील उड्डाणपुलाचे काम लवकरच



**दि.०६, नवी मुंबई :** तुर्भे रेल्वे स्थानकासमोरील उड्डाणपुलाचे काम येत्या काही दिवसात सुरू होणार आहे. याच उड्डाणपुलासाठी तुर्भेवासियांनी अनेक आंदोलने केली होते. यापूर्वीही उड्डाणपुलाचे काम सुरु केले होते. मात्र सदोष रचना असल्याचे समोर आल्यावर बांधकाम थांबवण्यात आले होते. आता नव्याने रचना करण्यात आलेल्या उड्डाणपुलाचे काम सुरू होणार असून त्यासाठी ४० कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. ठाणे बेलापूर मार्गावर वाहतूक मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. या मार्गाच्या एका बाजूला आद्योगिक क्षेत्र तर दुसऱ्या बाजूला नागरी वस्ती आहे. त्यात औद्योगिक क्षेत्रातच स्थानकासमोर नवी मुंबईतील सर्वात मोठ्या झोपडपट्ट्यांपैकी एक असलेली तुर्भे स्टोअर ही झोपडपट्टी वसली आहे. या झोपडपट्टीत राहणारे लोक कामानिमित्त लोकलचा वापर मोठ्या प्रमाणात करतात. त्यामुळे सकाळी आणि संध्याकाळी रस्ता ओलांडणाऱ्या पादचाऱ्यांची संख्या मोठी असते. यात अनेक अपघात होऊन आतापर्यंत सुमारे १० जणांचा मृत्यू झाला आहे तर २० पेक्षा अधिक लोक कायमचे अपंग झाले आहेत. त्यामुळे येथे उड्डाणपूल किंवा पादचारी उड्डाणपूल करावा या मागणीसाठी अनेक आंदोलने झाली आहेत.

**पुलाची वैशिष्ट्ये...**
रुंदी १७ मीटर तर लांबी ५०६ मीटर
–४०.९७ कोटी रुपयांचा निधी
दोन्ही बाजूंनी दोन मार्गिका
उड्डाणपुलाखाली स्वच्छ शहराला साजेशी प्रकाशयोजना

# सूर्यनारायणाचा वाढता प्रकोप, सावधान !!



या वर्षी एवढे भयंकर कडक ऊन पडत आहे. झाडांची कोवळी-ओली-हिरवी पाने दुपारी चिंबलेली दिसत आहेत. ऊन्हात फिरल्यास ऊन्हाचे असह्य चटके बसत आहेत. मागील मार्च महिन्यातच असे हाल होते. गर्दीचे रस्ते निर्जन दिसत असत. त्यामुळे स्वतःच्या आरोग्याची चिंता प्रत्येकांनी स्वतःच घेणे अत्यावश्यक वाटत आहे. आता एप्रिल अखेर आणि मे महिन्यातील तापमानाची तीव्रता यंदा मार्च महिन्यापासूनच जाणवायला लागली. तापमानाने चाळीशी पार केली असून राज्यात उष्णतेची लाट भडकली आहे. अधेमध्ये अवकाळी पाऊसही धुमाकूळ घालत आहे, मात्र उष्णता नावालाच कमी होत आहे. उष्माघात म्हणजे उष्णतेचा आघात होय. इंग्रजीत त्याला सनस्ट्रोक म्हणतात. या व्याधीत सुरुवातीला चक्कर, डोकेदुखी, मळमळ-उलटी, पोटात वेदना, गोंधळलेली अवस्था ही सामान्य लक्षणे रुग्णामध्ये पहायला मिळतात. याकडे दुर्लक्ष केल्यास जीवही गमवावा लागतो. जास्त वेळ उन्हात काम केल्याने शारीरिक समस्या निर्माण होऊ शकते. त्यातील गंभीर प्रकार म्हणजे उष्माघात- हिट एक्झॉशन आणि उष्माघात- हिट स्ट्रोक होय. सतत कडाक्याच्या उन्हात काम केल्यानंतर उष्माघात होतो. त्यातून होणारी तीव्र समस्या म्हणजेच उष्माघात होय. शरीराने मर्यादेपेक्षा जास्त उष्णता निर्माण केली किंवा उष्णता शोषून घेतली तर हायपरथर्मिया म्हणजेच अतिउच्च तापमानाचा आजार होतो. उष्माघात हा त्याचाच एक प्रकार आहे. बाहेरचे तापमान प्रमाणाबाहेर वाढले की शरीरातील तापमान नियंत्रित करण्याची यंत्रणा कोलमडते. ऊन आणि गरम हवेच्या झोतामध्ये काम करावे लागले किंवा तीव्र उष्णतेच्या संपर्कात गेल्यास शरीरातील तापमान नियंत्रित करणारी हायपोथॅलॅमसमधील यंत्रणा कोलमडून पडते आणि उष्माघात होतो. उष्माघात होण्याचे नेमके कारण म्हणजे शरीरातून बाहेर पडणाऱ्या उष्णतेहून शोषलेली उष्णता अधिक असते. यामुळे शरीराचे तापमान वाढते. उष्माघात झाल्यानंतर तातडीची वैद्यकीय सेवा मिळाली नाही तर मृत्यू ओढवतो. उष्माघात आणि ताप येणे या भिन्न प्रक्रिया आहेत. ताप येण्यामध्ये शरीराचे तापमान नेहमीहून अधिक राहते. व्याख्येप्रमाणे उष्माघात म्हणजे शरीराचे तापमान ३८.१ पेक्षा अधिक किंवा त्याहून अधिक तापमानाला स्थिर राहणे. सामान्यपणे दुपारी शरीराचे तापमान ३७.७० सेल्सिअस असते. उष्माघातामध्ये हे तापमान ४० सेल्सिअस होऊन ते जीवघेणे ठरते. जास्त तापमानामुळे शरीरातील महत्त्वाचे अवयव निकामी होतात. उष्माघात हा प्रामुख्याने अर्भकं, लहान मुलं, वयोवृद्ध, पाणी कमी पिणारे लोक, दीर्घ आजारी किंवा मद्यप्राशन करणाऱ्यांमध्ये आढळतो. तसेच हृदयरोग, फुफ्फुसांचे आजार, मूत्रपिंडाचे आजार, लठ्ठपणा, उच्च रक्तदाब, मधुमेह, मानसिक व्याधीसारख्या आजारांनी त्रस्त व्यक्तींनाही सहज उष्माघात होऊ शकतो. खेळाडूंना आणि बराच वेळ आउटडोअर काम करणाऱ्यांना उष्माघात होऊ शकतो. उष्माघाताची कारणे- अधिक प्रमाणात जंक फूड खाणे, आपल्याला घराबाहेर पडताच काहीतरी खायची इच्छा होते. उन्हात तर बाहेरचे अधिकच खात असतो. यामध्ये जंक फूडचे प्रमाण अधिक असते. यामुळे उष्माघात आणि उष्मा, थकवा देखील होऊ शकतो. काही जंक फूडमध्ये मोनोसोडियम, ग्लूटामंट्ससह गरम आणि हानिकारक पदार्थ असतात. याचे सेवन केल्याने शरीरातील उष्णता वाढवते. ज्यामुळे शरीर उष्माघाताचा सामना करू शकत नाही. शरीरातील पाण्याचा अभाव हे उष्माघाताचे एक प्रमुख कारण समजले जाते. उन्हाळ्यात डिहायड्रेशनची अनेक प्रकरणे पाहिली जातात. भर उन्हात कमी पाणी पिऊन घराबाहेर पडले तर उष्माघात तर होईलच तसेच पाण्याच्या अभावामुळे होणाऱ्या अनेक रोगांचाही आपल्याला सामना करावा लागू शकतो. अशा परिस्थितीत नारळ पाण्याचे सेवन नक्की केले पाहिजे. आपल्याला कोणत्या ना कोणत्या कारणाने भर उन्हात बाहेर पडावेच लागते. सूर्याची तीव्र किरणे तोंड आणि शरीराच्या इतर भागांना स्पर्श करतात, तेव्हा उष्माघात होण्याची शक्यता जास्त असते. कामानिमित्त बाहेर निघाल्याने आपल्याला हे सर्व सोसावे लागते. उष्णता टाळण्यासाठी डोके, तोंड आणि हात हलक्या कपड्याने झाकून ठेवावे. शक्य असल्यास छत्रीसह घराबाहेर पडलेले बरे. आपणास थायरॉईडची समस्या असेल तर उन्हात उष्माघात होण्याची शक्यता जास्त असते. थायरॉईड असमतोल झाल्यावर रक्तदाब बदलल्यास थकवा जाणवतो. अशा परिस्थितीत उन्हात जाणे टाळावे. उष्माघाताची लक्षणे- उच्च ताप, कमी रक्तदाब, चक्कर येणे, उलट्या होणे, स्नायूंमध्ये कडकपणा, सतत घाम येणे, अशक्तपणा, त्वचेवर पुरळ, बेहोश होणे, डोकेदुखी, श्वास घेण्यास समस्या, भीती आणि अस्वस्थता.

उष्माघातापासून बचाव असा करावा- उन्हात बाहेर निघणे टाळावे, उन्हात बाहेर पडताना छत्री वापरावी, उन्हाळ्यात चहा-कॉफी किंवा गरम पदार्थ टाळावे, शरीरात तापमान सामान्य राखण्यासाठी पाण्याची कमतरता येऊ देऊ नये, दिवसातून दोन ते तीन लीटर पाणी प्यावे, दीर्घकालीन काम टाळावे, उष्माघात झाल्यास डॉक्टरांना भेटावे, साखर असलेले पेय पिणे टाळावे, खुले व हलके कपडे घालावे, बाहेर पडण्यापूर्वी सनस्क्रीन आणि सनग्लासेस वापरावे, संतुलित आणि पौष्टिक आहार घ्यावे, जेव्हा तीव्र सूर्यप्रकाश असेल तेव्हा व्यायाम किंवा सायकल चालविणे टाळावे. अशाप्रकारे आग ओकणाऱ्या सूर्यनारायणाच्या प्रकोपापासून आपण वाचू शकतो. अन्यथा बळी पडू यात मुळीच शंका नाही!

**!! रखरखीत उन्हाळ्याच्या**
**सावधगिरीच्या इशाऱ्यासह**
**गरमागरम हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!**

**– संकलन व सुलेखन –**
**श्री.कृष्णकुमार निकोडे गुरूजी.**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३**

# रुग्णसेवेची बांधिलकी जपणारे - सिद्धिविनायक रुग्णालय

वैद्यकिय क्षेत्र हे रूग्णसेवेचे क्षेत्र राहिले नसुन पैसा कमावण्याचा धंदा झाला आहे आणि वैद्यकीय श्रेत्रात रूग्ण सेवा ही कधीकाळी ईश्वर सेवा मानली जायची मात्र आता वैद्यकीय श्रेत्रात 'पैसा ही भगवान है' मानला जातो. रुग्णालयात गेले म्हणजे लाखो हजारो रुपयांचे बिल आल्याशिवाय रुग्णाची सुटका नाही हा सार्वत्रिक अनुभव जनता घेत आहेत.

याच पार्श्वभूमीवर गेल्या काही दिवसांपासून पुणे सारख्या सांस्कृतिक शहरातील सांस्कृतिक वसा जपलेल्या मंगेशकर कुटुंबियांच्या नावाने चालविल्या जाणाऱ्या रुग्णालयाचे माणुसकी शुन्य वर्तन जगासमोर आले. विशेष म्हणजे चॅरिटी च्या नावाने नाममात्र दरात जमीन मिळवायची, सरकारच्या सोयी सवलती घ्यायच्या आणि रूग्ण सेवेची बांधिलकी न जपता केवळ पैसा कमावण्याचा धंदा या रुग्णालयाने कसा मांडला याचे वास्तव जगासमोर आले. विशेष म्हणजे गेल्या दहा वर्षांत या रुग्णालयाने एक रूपयाचा आयकर देखील भरला नसल्याचे समोर आले आहे.

आजवरच्या सर्व पक्षीय राज्यकर्त्यांनी सार्वजनिक आरोग्य सेवा, शिक्षण खाजगी क्षेत्राला आंदण देण्यातच धन्यता मानली परिणामी आज आरोग्य, शिक्षण, अन्न वस्त्र निवारा या मूलभूत गरजांसाठी देखील जनतेला लाखो रुपये मोजावे लागत आहेत अन्यथा तडफडुन विना ऊपचार मरावे लागते आहे. अशामुळे वैद्यकीय श्रेत्र बदनाम होत असले तरी याला काही अपवाद आहे आजच्या काळात देखील रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा मानून वैद्यकीय श्रेत्राशी बांधिलकी जपणारे अनेक डॉक्टर, रुग्णालये आहेत. काही दिवसांपूर्वीच मला हृदय विकाराच्या त्रासामुळे ठाण्यातील सिद्धिविनायक हॉस्पिटल मधे अँजिओप्लास्टी करावी लागली, तेव्हा वाटले होते आता, हजारो रुपये डिपॉझिट भरावे लागणार, लाखो रुपयांचे बिल हातात पडणार आणि एवढे करूनही ऊपचार कसे होणार याबाबत साशंकताच होती.

मात्र या बाबत मला आलेला सुखद अनुभव वाचकांसमोर मांडणे गरजेचे आहे. तेथील मुख्य संचालक डॉ. अमोल गिते यांनी सर्व गोष्टी समजुन घेतल्या, सहानुभूतीने सहकार्य केले, त्याच बरोबर ऊपचार देखील व्यवस्थित झाले. डिपॉझिट किंवा बिला बाबत देखील फारसे ताणुन धरले नाही कि पैसे भरा मग ऊपचार अशी भुमिका घेतली नाही.डॉ.अर्जुन सुसर यांनी धीर देत शस्त्रक्रिया यशस्वी पार पाडली. या वेळी इतर रूग्ण, नातेवाईक यांच्याशी बोलतांना अनेकांनी रुग्णालय, व्यवस्थापन, कर्मचारी यांच्या बाबत चांगल्याच भावना व्यक्त केल्या.

आजकाल साध्या आजारा साठी दवाखाना, हॉस्पिटल ची पायरी चढायचे म्हटले कि खिशाचा दहा वेळा विचार करावा लागतो शिवाय पैसा खर्च करून देखील योग्य वेळी योग्य ऊपचार होतील याची खात्री नाही. या सगळ्या पार्श्वभूमीवर आजही रूग्ण सेवेशी आणि रुग्णांशी बांधिलकी जपणारे काही डॉक्टर्स, रुग्णालये आहेत यात ठाण्यातील सिद्धिविनायक रुग्णालयाचा मला आलेला सुखद अनुभव समाजासमोर यावा आणि अशा रुग्णालयांचे कार्य समाजासमोर यायला हवे हे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. याच बरोबर गेल्या काही वर्षांपासून नाशिक जिल्हातील धामणगाव येथे एसएमबीटी हे रुग्णालय देखील सामान्य जनतेसाठी मोठा आधार ठरत आहेत.

सिद्दिविनायक रूग्णालय तसेच एसएमबीटी रूग्णालयात शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी करून रूग्णांवर मोफत ऊपचार तसेच शस्त्रक्रिया केल्या जातात. आज जनतेला पंचतारांकित ऊपचार करणारे डॉक्टर वा रूग्णालये नको आहेत तर किमान आरोग्य सुविधा, ऊपचार करणारे डॉक्टर आणि रूग्णालये हवी आहेत. ऐकिकडे वैद्यकीय श्रेत्रातील अपप्रवृत्ती समाजासमोर येत असतांना या चांगल्या गोष्टी देखील समाजासमोर आल्या पाहिजे. वैद्यकीय क्षेत्र हे जिवदान देणारे श्रेत्र आहे, डॉक्टरांमधे देव पाहिला जातो अशावेळी किमान नैतिकता, एथिक्स, तत्त्वनिष्ठा पाळली गेलीच पाहिजे आणि किमान काही डॉक्टर्स, रुग्णालये ती पाळतात ही समाधानाची बाब आहे.

**– अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**९१५८४९५०३७**